**ठळक बातम्या**

- सणांतून दिसणारी एकतेची भावना सातत्यानं बळकट करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधून आवाहन

- नागपूरमधे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वर्षप्रतिपदा उत्सवात प्रधानमंत्र्यांचा सहभाग /संघटन, समर्पण आणि सेवेची त्रिवेणी भारताला पुढं घेऊन जाण्यासाठी महत्वाचं सूत्र ठरणार असल्याचं प्रतिपादन

- शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या समस्यांचा अभ्यास करून त्या सोडवण्याची कृषी मंत्र्यांची ग्वाही

- गुढीपाडवा सणाचा सर्वत्र उत्साह /जागोजागी नववर्ष स्वागतयात्रांचं आयोजन

**आणि**

- आयपीएलमधे विशाखापट्ट्णम इथं सुरु झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सवर ७ गडी राखून विजय

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरच्या 'मन की बात' कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे विसावा भाग होता. आपल्या सणांतून दिसणारी एकतेची भावना आपल्याला सातत्यानं बळकट करायची आहे असं आवाहन त्यांनी केलं. महाराष्ट्रातल्या गुढीपाडव्यासह, देशभरात विविध ठिकाणी येत्या काही दिवसात नववर्षाच्या

स्वागतासाठी साजऱ्या होणार असलेल्या रोंगाली बिहू, पोईला बोइशाख, नवरेह सणाच्या, तसंच ईदच्याही शुभेच्छा त्यांनी दिल्या.

परीक्षा संपून लागलेल्या उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विद्यार्थी आणि युवा वर्गानं नवी कौशल्ये शिकावीत यावर त्यांनी आजच्या मन की बात मध्ये भर दिला. या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी उन्हाळी सुट्टीसाठी तयार केलेल्या MY-Bharat या दिनदर्शिकेची माहिती दिली.

उन्हाळा सुरु झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बातमध्ये जल संवर्धनावरही भर दिला. यानिमित्तानं त्यांनी कॅच द रेन या मोहीमेची माहिती दिली. ही मोहीम सरकारची नसून समाजाची, जनता जनार्दनाची मोहीम आहे, असं त्यांनी सांगितलं…

**होल्ड बाईट MKB- JALSAVARDHAN**

सामुदायिक पातळीवर जलसंवर्धनाच्या मोहिमांमध्ये सहभागी होण्याचं, तसंच उकाडा वाढत असल्यानं पक्ष्यांसाठी पाण्याचं भांडं ठेवण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

अलिकडेच झालेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये दिव्यांग खेळाडूंनी केलेल्या कामगिरीचीही प्रधानमंत्र्यांनी प्रशंसा केली.

यानिमित्तानं तंदुरुस्तीविषयी बोलतांना त्यांनी दिल्लीमध्ये आयोजित फिट इंडिया कार्निव्हलविषयी सांगितलं. आपापल्या परिसरात अशा प्रकारचे कार्निव्हल आयोजित करण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला केवळ १०० दिवस उरले असल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी करून दिलं. यानिमित्तानं त्यांनी सर्वांना आपल्या दिनचर्येत योगाभ्यासाचा अंतर्भाव करण्याचं आवाहन केलं.

जगभरात भारतीय समुदाय आपल्या सांस्कृतिक संवर्धनासाठी करत असलेल्या कामांची उदाहरण त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली.

पर्यावरणासाठी धोकादायक ठरत असलेल्या टेक्स्टाईल वेस्ट अर्थात कपड्यांपासून निर्माण होत असलेल्या कचऱ्यांच्या नव्या आव्हानाविषयी बोलताना, असा कचरा निर्माण करण्यात आज भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर असल्याची जाणिव त्यांनी करून दिली. मात्र यावरही अनेक स्टार्टअप्स आणि संस्था उपाय शोधत आहेत, शाश्वत फॅशन आणि कचरा व्यवस्थापनासाठी अभिनव पद्धतीनं काम करत आहेत असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

संघटन, समर्पण आणि सेवेची त्रिवेणी भारताला पुढं घेऊन जाण्यासाठी महत्वाचं सूत्र ठरणार असून विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी समाजातल्या सर्व घटकांनी याचा अवलंब करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नागपुरात केलं. माधव नेत्रालयाच्या प्रीमियम सेंटरचं भूमिपूजन करताना ते बोलत होते. माधव नेत्रालय गोळवलकर गुरूजी यांच्या आदर्शानुसार लाखो लोकांची सेवा करत असून आज आपण एका पुण्यसंकल्पाचे साक्षीदार बनत आहोत, असं प्रधानमंत्री म्हणाले. देशाल्या सर्व नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा देणं ही आपली प्राथमिकता आहे, आयुष्मान भारत सारख्या योजनांद्वारे नागरिकांना मोफत उपचार दिले जात आहेत, असं सांगत माधव नेत्रालय यात आपलं योगदान देत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले…

**बाईट मोदी- नेत्रालय**

देशातल्या गरीब, मध्यमवर्गीय नागरिकांना स्वस्त दरात औषधी उपलब्ध करून दिली जात आहे. वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढली आहे, मेडिकलच्या जागा वाढल्या आहेत, जास्तीत जास्त आणि चांगले डॉक्टर तयार करणं हे सरकारचं ध्येय असल्याचं ते म्हणाले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कामाचं कौतुक केलं. ज्याप्रमाणे संतांनी समाजाला नवी ऊर्जा देण्याचं काम केलं तसंच डॉ हेडगेवार आणि गोळवलकर  यांनीही समाजाला ऊर्जा दिली. संघ अंतरदृष्टी आणि बाह्यदृष्टीसाठी काम करणारी संघटना आहे, पूर, भूकंप किंवा कोणत्याही संकटात मदत करण्यासाठी संघाचे स्वयंसेवक तत्पर असतात, स्वयंसेवक नेहमीच निस्वार्थीपणे काम करतात असं ते म्हणाले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी ‘तमसो मा ज्योतिर्गमय’ या पुस्तकाचं प्रकाशनही केलं.

दृष्टीहिनांच्या जीवनात प्रकाश आणण्याचं काम माधव नेत्रालय गेल्या तीन दशकांपासून करत आहे. हे नेत्रालय केवळ महाराष्ट्रासाठीच नाही तर संपूर्ण मध्य भारतासाठी उपयोगी संस्था ठरेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. तर माधव नेत्रालय लोककल्याणाच्या प्रेरणेनं अव्याहतपणे कार्यरत आहे, असं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले.

त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागपूर मधल्या रेशिमबाग भागातील स्मृती मंदिराला भेट दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ केशव बळीराम हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर यांच्या स्मृतीस्थळांना प्रधानमंत्र्यांनी आदरांजली वाहिली. त्यानंतर दीक्षाभूमीवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकावर जाऊन मोदी यांनी

डॉ. बाबासाहोब आंबेडकरांना आदरांजली वाहिली. नागपूर - अमरावती रस्त्यावरल्या बाजारगाव इथल्या सोलर एक्सप्लोजिव्ह टेस्ट रेंज आणि रन वे सुविधेचंही प्रधानमंत्र्यांनी आज उद्घाटन केलं.

प्रधानमंत्र्याचं आज सकाळी नागपूर मधल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झालं, त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे त्यांच्या स्वागताला उपस्थित होते.

**<><><><><>**

शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या समस्यांचा अभ्यास करून त्या सोडवण्याचं आश्वासन कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिलं आहे. ते आज नाशिक जिल्ह्यात वावी इथल्या जामनदी खोरे शेतकरी उत्पादक कंपनीच्या १ हजार टन क्षमतेच्या गोदामाच्या बांधकामाचा प्रारंभ करताना बोलत होते.

शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असं त्यांनी सांगितलं. ‘स्मार्ट’ प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी उत्पादक कंपन्यांचं जाळं निर्माण झालं आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या पाठबळामुळे या प्रकल्पाला चालना मिळाली आहे. शेतीत भांडवली गुंतवणूक वाढवण्याची आवश्यकता असून त्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे, असं कोकाटे म्हणाले.

**<><><><><>**

वर्षप्रतिपदा, अर्थात गुढी पाडव्याचा सण सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे. रेशमी वस्त्र, कडुनिंब आणि साखरेच्या गाठ्यांच्या माळांनी सजवलेली

गुढी घरोघरी उभारुन, तिची पूजा करुन तसंच रांगोळ्या, झेंडूच्या फुलांच्या तोरणांनी सजावट करण्यात आली आहे. गुढीपाडव्यानिमित्त राज्यातल्या विविध मंदिरांमधे दर्शनासाठी भाविकांची गर्दी दिसत आहे. आज विविध ठिकाणी शोभायात्रांचं आयोजन करण्यात आलं होतं. मुंबईत गिरगाव इथं नववर्ष स्वागत यात्रा काढण्यात आली.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी गुढीपाडव्यानिमित्त राजभवनातल्या आपल्या निवासस्थानी गुढी उभारून पूजा केली. यावेळी त्यांनी सर्व उपस्थित कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना गुढीपाडवा आणि नववर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या.

**उत्तर मुंबईत** चारकोप, बोरिवली, दहिसर, मालाड इथं काढण्यात आलेल्या शोभायात्रांमध्ये केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल सहभागी झाले होते. कांदिवलीतल्या त्यांच्या लोककल्याण कार्यालयात गुढी उभारून पूजा केली.

**पुणे** शहर परिसरात आज सकाळ पासूनच विविध मंदिरात विशेष पूजाअर्चा होत आहे. पुण्यातल्या तुळशी बाग राम मंदिरासह विविध राम मंदिरात रामनवमीच्या कार्यक्रमांची सुरुवात आज पासून झाली.

**ठाण्यातल्या** कौपिनेश्वर मंदिरातून गुढीपाडव्यानिमित्त मिरवणूक काढण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार संजय केरळकर यांनी पालखीचं पूजन करून मिरवणुकीची सुरुवात केली.

**नाशिक**मध्ये विविध भागात ढोल ताशाच्या गजरात पारंपारिक पोशाखात सुमारे वीसहून अधिक नववर्ष स्वागत यात्रा काढण्यात आल्या.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज विशाखापट्ट्णम इथं झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं सनराईजर्स हैदराबादवर ७ गडी राखून विजय मिळवला. ७ गडी आणि २४ चेंडू राखून विजय मिळवला.

सनराईजर्स हैदराबाद संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र त्यांचा डाव ८ चेंडू बाकी असताना १६३ धावात आटोपला. अनिकेत वर्मानं सर्वाधिक ७४ धावा केल्या. हेनरिक क्लासेननं ३२ धावांचं योगदान दिलं. दिल्ली कॅपिटल्सतर्फे मिशेल स्टार्कनं ५ तर कुलदीप यादवनं ३ गडी बाद केले.

//<><><><><>//